Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

# पर्यावरण शिक्षण

प्रा. श्रीमती. एस. बी. ठेंग,
अध्यापक विदयालय संलग्न शिक्षणशास्त्र महाविदयालय,
नाशिक.

**प्रास्ताविक :**

२१ व्या शतकातील मानवाने प्रगतीची उत्तुंग शिखरे गाठलेली आहेत. मानवाच्या लक्षावधी वर्षांच्या इतिहासातून असे लक्षात येते की, मानव प्राणी व निसर्ग यांचे परस्परांशी अतूट नाते आहे. निसर्गातील अनेक प्राणीमात्रांपैकी मानवालाच प्रचंड बुध्दीमत्ता लाभलेली आहे. आपली बुध्दीमत्ता, कल्पनाशक्ती व तंत्रकौशल्याच्या बळावर मानवाने स्वतःची प्रचंड प्रगती केलेली आहे व आजही करीत आहे.

मानवाच्या या वैशिष्टयामुळे व समाजप्रियतेमुळे त्याच्या भोवतीच्या नैसर्गिक पर्यावरणाला सामाजिक पर्यावरणाची सुध्दा जोड मिळालेली आहे. परंतु दुसरीकडे वैज्ञानिक प्रगतीमुळे नैसर्गिक व सामाजिक पर्यावरणाविषयी गुंतागुंतीच्या व भयावह समस्या निर्माण झाल्या. या पार्श्वभूमीवर पर्यावरण विषयक जागृती होणे आवश्यक आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावरील पर्यावरण समस्येवर लक्ष देण्यासाठी युनेस्कोच्या (UNESCO)विदयमाने १९७० मध्ये पॅरीस येथे पर्यावरण शिक्षण या विषयी जागृती निर्माण करणारी पहिली आंतरराष्ट्रीय परिषद भरली होती. ५ जून १९७२ मध्ये स्विडनमधील स्टॉकहोम या शहरात पर्यावरण विषयक परिषद भरविण्यात आली. संयुक्त राष्ट्रसंघाने देखील पर्यावरण संरक्षणासाठी विविध कार्य सुरु केली.

युनेपव्दारा (United Nations Environmental Programme) पर्यावरण अभास व संशोधनाला चालना मिळाली. त्यानंतर वसुंधरा परिषद ही १९९२ ला व ३ ते १४ जून मध्ये एकूण १२ दिवस ब्राझिलमध्ये ' रिओ दि प्लामेरो ' या शहरात संपन्न झाली. यातुनच संयुक्त राष्ट्रसंघ पर्यावरण आयोगाची स्थापना झाली. दिनांक ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिन म्हणून साजरा केला जातो. भारतात १९८६ च्या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणात दिलेल्या दहा गाभाभूत घटकांमध्ये ' पर्यावरण शिक्षण ' हा घटक आहे. परंतु त्याचा अध्यापनात फारसा विचार झाला नाही. २००० सालच्या शालेय शिक्षणाच्या राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडयापर्यंत सर्वत्र पर्यावरण विषयक जाणिवीवर भर देण्यात आला. पर्यावरण असंतुलन व प्रदुषण हा प्रश्न भारतापुरताच मर्यादित नाही. तर जागतिक स्तरावरील प्रश्न म्हणून याचा सर्वत्र विचार केला जात आहे.

**पर्यावरण शिक्षणाची उद्दिष्टये :**

राष्ट्रीय स्तरावर पर्यावरण शिक्षणाची उद्दिष्टये पुढीलप्रमाणे सांगितली आहेत.

१. व्यक्तीमध्ये पर्यावरण विषयक जाणीव जागृती निर्माण करणे.
२. व्यक्तीमध्ये पर्यावरण विषयक समस्यांची जाणीव निर्माण करुन देणे.
३. व्यक्तीमध्ये नैसर्गिक साधन संपत्तीचा वापर काटकसरीने करण्याची जाणीव निर्माण करणे.
४. अपारंपारिक उर्जास्त्रोतांचा वापर करण्यास प्रेरीत करणे.
५. पर्यावरण संरक्षण व संवर्धन समस्या सोडविण्यासाठीच्या उपक्रमात व्यक्तीचा सहभाग प्राप्त करणे.

**पर्यावरण संरक्षण व संवर्धनाचे प्रयत्न :**

पर्यावरण ही संकल्पना केवळ प्राकृतिक व जैविक घटकांपुरती सिमीत नसून यामध्ये मानवाच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय, बौध्दीक कार्याच्या परिणामांचा समावेश होतो. नैसर्गिक साधन संपत्तीचे संधारण व संवर्धन करुन पुढील पिढीच्या

Impact Factor : 1.883 Peer-Reviewed Journal ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
THEME : ENVIRONMENT AND EDUCATION
{Bi-Monthly} Volume – IV Issue – III October 2015

हाती पर्यावरण सुरक्षितपणे पोहचवणे हे मानवाचे आदय कर्तव्य असुन समाजाची एक सामुहिक जबाबदारी आहे.

भारतीय संस्कृतीत निसर्गाचे दैववत पुजन केले जाते. यामध्ये विविध प्रकारचे वाङमयीन साहित्य, रिती रीवाज, परंपरा, वेद, सामाजिक उपक्रम तसेच अभ्यासांतर्गत, अभ्यासेतर व अभ्यासानुवर्ती कार्यक्रम यांचा समावेश आढळतो.

भारताने जागतिक पर्यावरण परिषदेत सक्रिय सहभाग घेऊन विविध पर्यावरणीय कार्यशाळांचे आयोजन केलेले आहे. भारत सरकारने १९८० मध्ये केंद्रिय पर्यावरण मंत्रालयाची स्थापना करून भोपाळ येथे राष्ट्रीय पर्यावरण संस्थेची स्थापना केली.

चीनमध्ये सर्वात प्रथम स्थापन झालेल्या ' निसर्गमित्र ' (Friends of Nature) या पर्यावरणीय संस्थेला अधिकृत मान्यता दिली गेली. इस्त्राईलमध्ये ' जीवन व पर्यावरण ' (Life and Environment) या नावाची राष्ट्रीय नियोजन व रचना मंडळाचे सार्व जनिक प्रतिनिधित्व करणारी संस्था कार्यरत आहे.

शालेय स्तरावर पर्यावरण शिक्षणासाठी उपयुक्त उपक्रम विकसीत करण्यासाठी लोकसंख्या व पर्यावरण या खात्याचे राज्यमंत्री मदत करतात. हे उपक्रम प्राथमिक व माध्यमिक शिक्षणाचे संचालनालय यांयामार्फत राबवले जातात.

**पर्यावरण शिक्षणात शिक्षकाची भूमिका :**

व्यक्तीच्या जीवनात शिक्षकाचे स्थान हे अति महत्त्वाचे आहे. पर्यावरण शिक्षण देण्याची जबाबदारी प्रत्येक शिक्षकाची आहे. त्याचबरोबर समाजसेवी संस्था, व प्रसार माध्यमे यांची सुध्दा आहे.

शिक्षकांनी, प्रचलित अभ्यासक्रम, पाठयपुस्तके, सहली इत्यादी उपक्रमाव्दारे पर्यावरण शिक्षण दिले पाहिजे. पर्यावरण शिक्षणात पर्यावरण विषयक संवेदनशिलता निर्माण केली पाहिजे. त्याच बरोबर पर्यावरण शिक्षणात पर्यावरण विषयक कौशल्ये, मूल्ये व अभिवृत्ती विकसीत करण्यावर भर दिला पाहिजे. पर्यावरणाचे संधारण व संवर्धन करण्यास प्रेरित केले पाहिजे. पर्यावरणाच्या समस्या दूर करण्यासाठी लोकचळवळ व लोकजागृती केली पाहिजे.

**समारोप :**

मानव व पार्यावरण यांचा अतिशय जवळचा सहसंबंध आहे. पृथ्वीवरील सर्व घटक हे परस्पर पुरक व परस्परांवर अवलंबुन आहेत. मात्र मानवाने आपल्या स्वार्थासाठी नैसर्गिक साधनसंपत्तीचा केलेला अतिरेकी वापर आज पर्यावरणीय समस्येचे कारण बनला आहे. यामुळे मानवासह समस्त मानव जातीच्या अस्तित्वालाच धोका निर्माण झाला आहे. थोडक्यात मानवाने आपल्या चूकांमुळे अनेक नवनवीन प्रश्न निर्माण केले असून स्वतःचे अस्तित्वच धोक्यात घातले आहे. पर्यावरणीय समस्यांच्या विळख्यातून मानवी समाज, जीवमात्र यांचे संरक्षण करण्यासाठी पर्यावरणाच्या समस्यांचा अभ्यास करणे व त्या दूर करणे आवश्यक आहे. त्यासाठी शिक्षकाबरोबरच पालक, शैक्षणिक संस्था, सामाजिक संस्था यांनी सुध्दा भाग घेणे आवश्यक आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१. डॉ. हेमलता पारसनीस, डॉ. जयश्री बहुलीकर, '**पर्यावरण शिक्षण**', नित्यनूतन प्रकाशन, पुणे.
२. डॉ. व. झा. साळी, डॉ. दत्तात्रेय तापकीर, प्रा. दिपक चव्हाण, (२००८) '**पर्यावरण शिक्षण**', नित्यनूतन प्रकाशन, पुणे.
३. प्रा. सतीश शिर्के पाटील, '**पर्यावरणीय दिनविशेष**', ओंकार प्रकाशन, अहमदनगर.
४. **संस्कार** (२००९–१०) वार्षिक नियतकालिक, शिक्षणशास्त्र महाविदयालय, नासिक.